# प्रेसनोट

## पोलीस स्टेशन वाठोडा येथील महिला पोलीस उपनिरीक्षक यांचेविरुध्द A.C.B. नागपूर पथकाने केली कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार यांनी एका महिलेकडून केलेल्या कामाचे कमीशन चे पैसे न मिळाल्यामुळे पोलीस स्टेशन वाठोडा येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर अर्जाचे चौकशी दरम्यान सदर महिलेने तक्रारदार यांचेविरुध्द छेडछाडीची तक्रार केली होती त्यानुसार तक्रारदार यांचेविरुध्द कार्यवाही न करण्याकरिता श्रीमती प्रणाली बेनके, महिला पोलीस उपनिरीक्षक , पोलीस स्टेशन वाठोडा यांनी खाजगी इसमामार्फत दिनांक २८/०२/२०२६ रोजी २०,०००/-रू. लाचेची मागणी केल्याची तक्रार यातील तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयात केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही केली असता दिनांक ०६/०३/२०२६ रोजी यातील आलोसे श्रीमती प्रणाली बेनके, पोलीस उपनिरीक्षक, पोस्टे वाठोडा यांचेकडे लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही केली असता, श्रीमती प्रणाली बेनके यांनी तक्रारदार यांना ३०,०००/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/-रू. लाच रक्कम पोलीस स्टेशन वाठोडा नागपूर शहर येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. नंतर आलोसे श्रीमती प्रणाली बेनके यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून आज दिनांक ०२/०६/२०२६ रोजी आलोसे श्रीमती प्रणाली बेनके, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन वाठोडा यांना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन वाठोडा, नागपूर शहर येथे लाचेच्या मागणीबाबत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्रीमती शुभांगी वानखेडे यांचे पर्यवेक्षणात सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री रविन्द्र सहारे, सापळा पथक पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली आठवले, मपोहवा श्रीमती अस्मिता मल्लेलवार, सरिता मेश्राम, अनिल बहिरे, पोना मिलींद मेश्राम, चालक मपोशि हर्षलता भरडकर यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील खालील क्रमांकावर संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०